# दिनांक 16.08.2017

# वाट चुकलेल्या वाटसरूंना शोधण्यात कर्जत पोलीस यशस्वी

1. कर्जत पोलीस ठाणे येथे दिनांक 16/08/2017 रोजी 21.45 वा.चे सुमारास स्वप्नील कदम नावाच्या इसमाने कर्जत पोलीस येथे फोन करून तो व त्याचे सोबतचे मित्र व 02 मैत्रिणी कोंडाणे येथील जंगलात वाट चुकले असून ते जंगलात भरकटत असल्याबाबत कळविले.

सदर माहिती प्राप्त होताच कर्जत पोलीस ठाण्याच्या महिला पोलीस निरीक्षक श्रीमती तानवडे यांनी त्या इसमास त्यांना आहे त्या ठिकाणी एखाद्या सपाट जागेवर थांबून राहण्याचा सल्ला दिला. त्यानंतर त्या इसमास आजूबाजूच्या खाणाखुणा विचारल्या त्यावेळी त्यांनी सांगितले कि बाजूला उंचावरून पाणी पडत असल्याचे त्यांनी सांगितल्याने ते धबधब्याजवळ आहेत असा अंदाज बांधून पोलीस निरीक्षक तानवडे यांनी त्वरित कोडाणे गावचे पोलीस पाटील श्री.रवींद्र महादेव गायकवाड यांचेशी संपर्क साधून त्यांना त्याबाबत काय काय उपाययोजना करता येईल याबाबत विचारणा केली.

रात्रीची वेळ असल्याने सदर मुलांची सुटका करणे अवघड असतानाही पोलीस निरीक्षक श्रीम.सुजाता तानवडे यांनी तेथील स्थानिक आदिवासी बंधूंची मदत घेवून कर्जत पोलीस ठाण्यचे सहा पोलीस निरीक्षक श्री शिंदे, पोलीस शिपाई /सहाणे, महिला पोलीस कर्मचारी जाधव व सहा फौज/श्री बजरंग मुसळे असे सरकारी जीपसह रवाना झाले. त्या ठिकाणी कोंडणे गावचे पोलीस पाटील श्री रवींद्र गायकवाड व त्यांचेच गावात राहणारे एरू जाणू मेंगार, मधु हिरू पीटकर, वाळकु कमळू निरगुडा सर्व रा. उंबरवाडी, यांचे मदतीने अत्यंत मेहनतीने व मोठ्या शिताफीने रात्रीच्या वेळी एक ते दीड तासात 2 मुले व 2 मुलीना सुखरूप बाहेर काढण्यात यशस्वी झाले.



